N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापूर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0084 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/02/2023 00:43 वाजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):**
   **Date From (दिनांक पासून):** 13/02/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/02/2023
   **Time From (वेळेपासून):** 17:30 वजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 19:30 वजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/02/2023 **Time (वेळ):** 23:00 वजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/02/2023 00:15 वजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 4.00 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण,कनिष्ठ अभियंता या कार्यालयाचे , कबनुर ,हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पंढरी दिनकर पाटील

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** दिनकर पाटील

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विठठल मंदिर गल्ली,हटेल वैशाली गार्डन च्या पाठीम,कबनुर ,हातकणंगले,शिवाजी नगर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु लोंगे पोस्ट परखंदळे,गगनबावडा,गगनबावडा,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9823527469

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रोहीत आनंदा खोत | | वडील का नाम : आनंदा खोत | 1. सन्मती हायस्कुलजवळ ,तारदाळ, हातकणंगले,शहापूर पोलीस स्टेशन, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 13/02/2023

मी पंढरी दिनकर पाटील, वय - 36 वर्षे, व्यवसाय - इलेक्ट्रीकल , रा. हॉटेल वैशाली गार्डन च्या पाठीमागे, विठठल मंदिर गल्ली, कबनुर ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर मुळ रा. मु. लोंगे, पोस्ट परखंदळे, ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर मो.नं. 9823527469 आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की

मी दिनांक 13/02/2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उप अधीक्षक श्री सरदार नाळे यांचेसमक्ष हजर राहुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारीवर पुढील कारवाई करणेकरीता त्यांनी पोलीस निरीक्षक नितीन कुंभार साहेबांना बोलावुन घेवुन त्यांना कारवाई करणेबाबत आदेशीत केले. त्यानंतर कुंभार साहेबांनी शासकीय पंच उपलब्ध करून घेतले व अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूरच्या कार्यालयात माझी व दोन्ही पंचाची एकमेकांशी ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी तक्रार सांगीतली की,

मी वरील पत्यावर राहणेस असुन मी घरगुती लाईट फिटींगची कामे करतो. माझे शेजारी राहणारे सौ सुमित्रा अर्जुन चव्हाण यांचे घरातील लाईट फिटींग चे काम मी केलेले असून त्यांनी नवीन विद्युत मीटर जोडणी करिता दिनांक 30/01/2023 रोजी महावितरण शाखा कबनुर येथे त्यांनी आपले नावे अर्ज केलेला आहे. सौ सुमित्रा चव्हाण यांना वेळ नसल्याने त्यांनी मला कार्यालयीन बाबीची पुर्तता करणेस सांगितले आहे. त्याप्रमाणे मी शाखा कबनुर येथे जावुन तेथील मुल्ला साहेब यांना भेटलो असता त्यांनी रोहीत खोत यांना नवीन विद्युत मीटर जोडणी सव्र्हे करणेस माझे समक्ष सांगितले परंतु वायरमन रोहीत खोत यांनी सव्र्हे केला नाही म्हणुन मी त्यांना चार पाच दिवसापुर्वी भेटलो असता त्यांनी सौ सुमित्रा चव्हाण यांचे नवीन विद्युत मीटर जोडणीचा सव्र्हे करून देणेसाठी 300/-रूपये द्यावे लागतील अशी मागणी केली असुन आज रोजी मी त्यांना भेटायला जाणार असुन त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रारी अर्ज दिला.

त्यानंतर श्री कुंभार साहेबांनी मला कबनुर गावचे पाठीमागे साजणी रोडजवळ थाबणेस सांगुन सदर ठिकाणी जावुन पुढील कारवाई करण्याचे आहे असे सांगीतले. मला लागलीच तेथे जाण्यास सांगुन कुंभार साहेब, पंच, स्टाफ असे पाठीमागुन येत असल्याचे सांगीतले. मी काहीवेळाने साजणी रोडलगत पोहचलो त्यांनतर वरील सर्वजण तेथे आले. त्यावेळी शासकीय गाडी रोडलगत असले मोकळया मैदानात थांबविली त्यानंतर मला शासकीय वाहनात बोलावुन घेवुन कुंभार साहेबांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचाना देवुन त्या व्हाईस रेकॉर्डरमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर वायरमन रोहीत यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करण्याचे असलेने मला तसेच पंच नं.1 विकास फडतारे यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मी वायरमन रोहीत यांना फोन लावुन ते कोठे आहेत? याबाबत विचारले असता त्यांनी पंधरा मिनीटात ऑफीसमध्ये येत असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि कुंभार यांनी त्यांचेकडील व्हाईस

रेकॉर्डर चालु करून तो माझ्या गळयात अडकवुन मला व पंच नं.1 विकास फडतारे यांना माझेकडील मोटर सायकलने कबनुर येथील महावितरणचे कार्यालयात वायरमन रोहीत यांची भेट घेणेकरीता 17.30 वाजता पाठविले. सदर ठिकाणी मी व पंच असे गेलो असता तेथे वायरमन रोहीत खोत उपस्थित होते. मी त्यांना भेटलो त्यावेळी त्यांनी माझेकडे सौ सुमित्रा चव्हाण यांचे नवीन विद्युत मीटर जोडणीचा सव्हे केलेला असुन तुझ्याकडे अजुन दोन कामे आहेत त्या तीन कामाचे शंभर रूपयेप्रमाणे एकूण 300/- रूपयांची मागणी केली त्यावेळी मी त्यांना सौ सुमित्रा चव्हाण यांचेकडुन पैसे आणुन देतो असे म्हणुन मी व पंच नं. 1 फडतारे असे कुंभार साहेब थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे त्यांनी मला व पंच 1 फडतारे यांना हकीकत विचारून तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन खात्री केली.

त्यानंतर वायरमन रोहीत खोत यांच्यावर सापळा कारवाई अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 300/- रूपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचाना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या त्यांच्या कामाचे अनुषंगाने कुंभार साहेबांनी सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाई करण्याकरीता व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्या गळयात अडकविले त्यानंतर मी व पंच 1 असे माझेकडील मोटर सायकलने रवाना झालो. तसेच आमचे पाठोपाठ कुंभार साहेब, पंच नं.2 चैगुले व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन महावितरण कबनुर कार्यालयाचे जवळ येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी महावितरण शाखा कबनुर येथे गेलो त्यावेळी तेथे वायरमन रोहीत खोत नव्हते म्हणुन मी त्यांना फोन लावला त्यावेळी त्यांनी ते थोडयावेळात येत असल्याचे सांगीतले. त्यानंतर थोडयावेळाने आम्ही थांबलेल्या ठिकाणी वायरमन रोहीत खोत आले. त्यावेळी मी त्यांना 300/- रूपये घेवु◌न आल्याचे सांगीतले. त्यावेळी ते बरं म्हणाले त्यानंतर मी वायरमन रोहीत यांना पैसे देवुन ते पैसे माजुन घ्या असे म्हणालो त्यावेळी त्यांनी पैसे मोजुन त्यांचे शर्टचे खिशात ठेवले. त्यावेळी मी पैसे स्विकारले नंतरचा डावा हात डोक्यावरून फिरवण्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लागलीच पोलीस निरीक्षक कुंभार साहेब, पंच नं.2 चैगुले व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन वायरमन रोहीत यांना 19.30 वाजता पकडले.

त्यावेळी मला कुंभार साहेब यांचेकडुन समजले की, वायरमन रोहीत खोत यांचे पुर्ण नाव रोहीत आनंदा खोत, वय- 24 वर्षे, कंत्राटी वायरमन, नेमणुक - म.रा.वि.वि.कं.मर्यादीत शाखा कार्यालय कबनुर, रा. सन्मती हायस्कुलजवळ तारदाळ, ता. हातकणंगले जि.कोल्हापूर असे असल्याचे समजले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रा◌ामगृह शहापूर, ता. हातकणंगले येथे पुर्ण करण्यात आली.

तरी मी कबनुर येथील सौ सुमित्रा अर्जुन चव्हाण यांचे घरातील लाईट फिटींग चे काम घेतले असुन सौ सुमित्रा चव्हाण यांचे नवीन विद्युत मीटर जोडणीचा सव्र्हे करून देणेसाठी रोहीत आनंदा खोत, कंत्राटी वायरमन, नेमणुक - म.रा.वि.वि.कं.मर्यादीत शाखा कार्यालय कबनुर यांनी माझेकडे अप्रामाणिकपणे 300/- रूपयांची लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडले आहे. म्हणून माझी रोहीत आनंदा खोत, वय- 24 वर्षे, कंत्राटी वायरमन, नेमणुक - म.रा.वि.वि.कं.मर्यादीत शाखा कार्यालय कबनुर, रा. सन्मती हायस्कुलजवळ तारदाळ, ता. हातकणंगले जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगीतलेप्रमाणे संगणकावर टंकलिखत केलेली असून ती मी वाचुन पाहीली असता ती बरोबर आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): mahadev narayan waghmode(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

पंढरी दिनकर पाटील

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

ठाणे अंमलदार

Name (नाव): mahadev narayan waghmode

Rank(पद): I (Inspector)

शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी

No.(सं.):